Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# MAHARASHTRATIL BALKUPOSHNACHI SAMASYA : EK ABHYAS



**NIKAM AMBIKA BABU**
Research Student
Dept. of Economics
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad MS
ambikanikam91@gmail.com

# महाराष्ट्रातील बालकुपोषणाची समस्या : एक अभ्यास

**निकम अंबिका बाबू**

अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.
मो. ९७६७५९२६३५
ई-मेल - ambikanikam91@gmail.com

**प्रस्तावना :**

२०११ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये ०-१४ वर्षे वयोगटातील बालकांचे प्रमाण हे ३०.८ टक्के इतके आहे. हे प्रमाण इतर देशांच्या तुलनेत अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे म्हणून भारत हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी २०२० मध्ये भारत महासत्ता होण्याचे स्वप्न (Vision 2020) ते केवळ या तरुणांच्या भरवशावर पाहिले होते. आजचा बालक हा उद्याचा नागरिक आहे. मात्र या बालकांमध्ये दिवसेंदिवस कुपोषणाचे प्रमाण वाढताना दिसून येते. काही कुपोषितग्रस्त बालके ३ महिने, ६ महिने, १ वर्ष किंवा २ वर्षही जीवंत राहत नाहीत. काहीही दोष नसतांना ही बालके जग पाहण्यापूर्वीच मरण पावतात म्हणजेच मानवी भांडवलाची होणारी ही हानी देशाच्या विकासात प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरते. जन्माला येणाऱ्या बालकांचा काहीही दोष नसताना होणारी ‘कोवळी पानगळ’ आपल्या व्यवस्थेने त्यांच्यावर केलेला हा एक अन्याय आहे असेच म्हणता येईल.

उद्याचा नागरिक बनणाऱ्या बालकाची सकस वाढ ही विकासाची प्राथमिक अट असली पाहिजे. कारण सक्षम बालकेच उज्ज्वल भारत घडवू शकतात. तसेच या बालकांनाही निरोगी व आरोग्यदायी जीवन जगण्याचा अधिकार मिळणे ही काळाची गरज आहे. सक्षम शासन व प्रशासनासह समाजातील प्रत्येक नागरिकाने कुपोषणाच्या समुळ उच्चाटनासाठी सहकार्य करणे महत्वाचे ठरेल. समाजातील कुपोषणासंबंधीत वास्तव समाजासमोर आणले जावे म्हणून हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

**महत्त्वाची शब्द : महाराष्ट्र, बालकुपोषण, समस्या**

**उद्दिष्टे :**

१) महाराष्ट्रातील बालकुपोषणाचे अध्ययन करणे.

२) महाराष्ट्रातील बालकुपोषणाचे प्रमाण काढणे.

३) बालकुपोषण निर्मूलनाच्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

**१) डॉ. अभय बंग समिती अहवाल (२००३):**

आदिवासींच्या आरोग्यावर आधारित 'Tribal Health in India' नावाचा अहवाल २००४ तज्ञ समितीने सादर केला. या समितीमध्ये डॉ. अभय बंग हे अध्यक्ष होते. इतर ११ जण हे सदस्य होते. ज्यामध्ये मनोज झालानी, नैडोनो अंगामी (नागालँड), एच. के (मुंबई), डॉ. योगेश जैन (बिलासपूर), डॉ. जोसेफ मारियानस कुजुर (नवी दिल्ली), प्रो. दिलीप मावळणकर (गांधी नगर), डॉ. फौजदार राम (मुंबई), डॉ. नीरू सिंग (जबलपूर), डॉ. एच सुदर्शन (कर्नाटक), डॉ. टी. सुंदरम (नवी दिल्ली), जॉईट सेक्रेटरी, आदिवासी मंत्रालय भारत सरकार इ. ११ सदस्यांचा समावेश होता. या अहवालामध्ये एकूण ११ प्रकरणे देण्यात आलेली आहेत. त्यामध्ये भारताची आदिवासी जमातीची ओळख, त्यांचे आरोग्य, आदिवासींच्या समस्या, आदिवासींना अडचणींमधून बाहेर काढून त्यांचे भविष्य कसे सुधारले जाईल व त्यांच्यापर्यंत मानवी व इतर आरोग्य सेवा कशाप्रकारे पोहचविल्या जातील याबद्दल सर्व घटकांचा आढावा घेण्यात आलेला आहे. संबंधित अहवालामध्ये आदिवासी समाजातील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, अशिक्षितपणा, गरीबी, दारिद्र्य इ. सारख्या सर्व सूक्ष्म घटकांचा अभ्यास केलेला आहे. अभय बंग समितीचा हा अहवाल केंद्र शासनाने २०१४ ला स्वीकारला व त्या अहवालाच्या आकडेवारीवरून केंद्र व राज्य स्तरावर आदिवासींच्या आरोग्यासंबंधी महत्वाची पावले उचलण्यात आलेली आहेत. ०-५ वर्षे वयोगटातील आदिवासी समाजातील बालकांचा मृत्यू, जन्मजात बालकांचा मृत्यू तसेच कमी वजनाची बालके व कुपोषित बालकांची सविस्तर आकडेवारी दिलेली आहे.

**२) डॉ. चंदनसिंह रोटेले :**

यांनी 'कुपोषण आदिवासी समुदायाची दुर्बलता' हे पुस्तक लिहिलेले आहे. ते आठवले समाजकार्य महाविद्यालय भंडारा आणि चंद्रपूर येथे अध्यक्ष आहेत. तसेच एम.एस.डब्ल्यू., एम.फिल. (समाजकार्य) आणि पीएच.डी. (समाजकार्य) इ. झालेले आहे. त्यांनी प्रस्तुत पुस्तकामध्ये एकूण पाच प्रकरणाचा समावेश केलेला आहे. प्रथम प्रकरण हे भारतीय आदिवासी व कुपोषणाची समस्या, दुसरे प्रकरण अध्ययन पद्धती व साहित्य परिक्षण, तिसरे प्रकरण आरोग्याविषयी जागृती आणि सामाजिक, आर्थिक दर्जा, प्रकरण चौथे कुपोषणाचा प्रभाव व शासकीय उपाययोजना आणि प्रकरण पाचवे प्रमुख निष्कर्ष व शिफारशी हे दिलेले आहे.

प्रस्तुत पुस्तकाद्वारे आदिवासी जीवनाला वा विकासाला प्रभावित करणारी कुपोषणाची समस्या यावर आध्यात्मिक वा सामाजिक प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. कुपोषण ही अत्यंत गंभीर समस्या असून कुपोषाची समस्या फक्त आपल्या राज्यापुरती किंवा देशापुरती मर्यादित नसून अवघ्या जगासाठी ते एक आव्हान असल्याचा गंभीर इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. कुपोषण निर्मूलनाला एका सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले पाहिजे, कारण ही एक सामाजिक समस्या आहे. कुपोषणाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी कुपोषणासंबंधीत सूक्ष्म घटकांचा अभ्यास केला जावा यासाठी संदर्भित विषय निवडलेला आहे.

**३) सुजाता के दास :**

यांनी 'कुपोषण एक ज्वलंत समस्या' हे पुस्तक लिहिले आहे. त्या एक बालरोग तज्ञ आहेत. त्या दिल्ली युनिर्व्हसिटीमधून बालकांच्या आरोग्यावर संशोधन केलेले आहे. कुपोषण ही एक सद्यस्थितीला अत्यंत महत्त्वाची समस्या बनलेली आहे. भारतामध्ये दर साडेतीन मिनिटाला एका बालकाचा कुपोषणाने मृत्यु होतो. या आकडेवारीच्या आधारावर कुपोषण ही ज्वलंत समस्या बनली आहे हे लक्षात येते. कुपोषणामुळे बालकांचे मानसिक संतुलनही बिघडते. त्यांनी या पुस्तकामध्ये कुपोषणाची कारणे, प्रकार आणि परिणाम याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे. कुपोषणाकडे जर दुर्लक्ष झाले, तर के कुपोषण

आपल्या भावी पिढीला काळाआड नेल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी शासनासहीत संपूर्ण मानव जातीने जागृत होऊन योग्य त्यावेळी योग्य ती पावले उचलणे अगत्याचे ठरते. कुपोषण हे प्रादेशिक नसून संपूर्ण देशभर याचे बळी जाताना दिसते. जगामध्ये कुपोषणग्रस्त ६.८ देशामध्ये भारताचा दुसरा क्रमांक लागतो. लेखिकेने समाजातील विविध पैलू या पुस्तकात उलगडलेले दिसून येतात.

**४) डॉ. सविता मल्होत्रा :**

डॉ. सविता मल्होत्रा यांनी त्यांच्या 'कुपोषण' या पुस्तकामध्ये त्यांनी कुपोषणाच्या प्राथमिक अवस्थेपासून सविस्तर माहिती दिलेली आहे. कुपोषण हे अंधश्रद्धा नसून अपुऱ्या आहारामुळे बालक, महिला यांना होणारा आजार आहे. कुपोषणावरील सर्व बारकाईचा अभ्यास करून त्यांनी हे पुस्तक लिहिलेले आहे. कुपोषणामुळे बालकाचे आयुष्यच नव्हे तर भारताच्या उज्ज्वल भविष्याचा सर्वनाश होतो. त्यामुळे कुपोषणाविरुद्धचा लढा हा केवळ त्या बालकाचा नसून संपूर्ण कुटुंबाचा असतो. लेखिकेच्या पुस्तकात द्वितीय आधार सामग्रीचा अभाव दिसून येतो. म्हणूनच प्रस्तुत संशोधनामध्ये कुपोषणाची कारणे, त्याचे प्रकार, परिणाम आणि समाजावर होणारा परिणाम यांची सविस्तर माहिती दिलेली असून प्रस्तुत संशोधन हे उपयुक्त असल्याचे दिसून येते.

**५) डॉ. सावंत दिपक रामचंद्र :**

यांचे ''वास्तव कुपोषणाचे'' हे पुस्तक आहे (प्रकाशन इंकिंग इनोव्हेशन वडाला मुंबई) सावंत यांनी या पुस्तकातून मेळघाट, पालघर, ठाणे या भागातील कुपोषणाचे विदारक चित्र समाजासमोर ठेवलेले आहे. आदिवासी बहुल भागातील रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांच्या अधीन असणारी लोकसंख्येमुळे कुपोषणाची तीव्रता वाढलेली दिसून येते. आदिवासी भागातील विदारक स्थिती त्यांनी मांडलेली आहे. कुपोषण व बालमृत्यु हे संवेदनशील विषय आहेत. उद्धव ठाकरेसोबत सावंत यांनी आदिवासी दुर्गम भागात शिबिरे घेतलेली होती. पालघर येथील झालेल्या बालमृत्युमुळे सावंत यांच्या अध्यक्षतेखाली पालघर जिल्हा टास्कफोर्स स्थापन केला होता. त्यांनी नेहमी या भागात

दौर केलेले आहे. या कादंबरीमध्ये ग्रामीण भागात काम करणारी आशा स्वयंसेविका ही मुख्य नायिका आहे. मेळघाट किती दुर्गम आहे आणि तिथं असलेल्या विपरित परिस्थितीत आरोग्ययंत्रणा कशी काम करते यांचे वास्तवदर्शी चित्रण या कादंबरीतून दिसून येते.

**संशोधन पद्धती :**


दुय्यम आधारसामग्रीसाठी विविध संस्थाचे अहवाल आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य शासनाचे, विविध संस्थांनी प्रसिद्ध केलेले अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ, विविध नियतकालिके, संकेतस्थळे, शोधप्रबंध इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलन, वर्गीकरण, सारणीय विश्लेषण, अर्थनिर्वचन, प्रतिशत प्रमाण, सरासरीसाठी संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करण्यात आला. सादरीकरणासाठी विविध आलेख, आकृत्या, नकाशे व निष्कर्ष काढण्यासाठी गरजेनुसार संख्याशास्त्रीय तंत्राचा योग्य त्या ठिकाणी वापर करण्यात आला आहे.

**महाराष्ट्र आणि कुपोषण :**

देशात महाराष्ट्राचा क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसरा आणि लोकसंख्येच्या दृष्टीने दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वाधिक दरडोई उत्पन्न असलेल्या राज्यांपैकी एक आहे. उत्पन्नाच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात दुसरा क्रमांक लागतो. परंतु राज्यातील ५० टक्के कुटुंबातील ९० टक्के लोकांना एका दिवसाकाठी आवश्यक असणाऱ्या २७०० उष्माकांपेक्षा कमी उष्मांक अन्नातून मिळतात. डॉ. अभय बंग समितीच्या अहवालानुसार बालकामधील कुपोषणाच्या बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक भारतातील मागासलेल्या प्रातांच्या रांगेत लागतो. एवढेच नाही तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील कुपोषित बालकांच्या प्रमाणापेक्षा महाराष्ट्रातील आदिवासी भागातील कुपोषित बालकांचे प्रमाण दुपटीने अधिक आहे. याचा अर्थ महाराष्ट्राने विविध क्षेत्रात प्रगती केली असली तरी आरोग्य व पोषण आहार या क्षेत्रात विषमता मोठ्या प्रमाणात आढळते. महाराष्ट्रात किनवट तालुक्यात २०१९-२० साली मध्यम कुपोषित ३९१, तीव्र कुपोषित बालके १७३ असल्याचे आढळून आले. तसेच मध्यम कुपोषित बालकांचे प्रमाण २.०९ व तीव्र कुपोषित बालकांचे

प्रमाण ०.९२ टक्के इतके आहे. महाराष्ट्रातील अती तीव्र कुपोषित बालकांची संख्या एक लाखाच्या आसपास आहे. त्यात तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण ५.४ टक्के व मध्यम कुपोषित बालकांचे प्रमाण २१.२ टक्के आहे. याचा अर्थ जवळपास ८ लक्ष १५ हजार बालके तीव्र कुपोषित असून ३२ लक्ष बालके मध्यम कुपोषित आहेत. १९७५ ते १९८८ या काळात राष्ट्रीय आणि महाराष्ट्रातील तीव्र कुपोषणाचे प्रमाण बरेच कमी आहे. आदिवासी भागातील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण सर्वात जास्त असून जवळपास १५ टक्के आदिवासी मुले तीव्र कुपोषितमधील आहेत. हे प्रमाण ग्रामीण महाराष्ट्रातील मुलांच्या तुलनेत दुप्पट आहे. महाराष्ट्रामध्ये ग्रामीण आणि शहरी भागात कुपोषणाबाबत मोठी तफावत आहे. ग्रामीण भागात अधिक कुपोषित बालके आहेत. २०१९-२० च्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-5) नुसार ५ वर्षाखालील एकूण ३५.२ टक्के बालकांची वयानुसार उंची कमी होती. तर मुले २५.६ टक्के मुले ही कमी वजनाची होती. तसेच लहान वयातील मुलांमध्ये शहरी भागाच्या तुलनेत १४.६ टक्के अशक्तपणा आढळून आला. तीन वर्षाखालील ७२ टक्के मुलांमध्ये रक्ताची कमतरता आढळून आली. महाराष्ट्रामध्ये पहिले सहा महिने फक्त ७१ टक्के मुलांना आईचे दूध मिळते. बाळाच्या जन्मानंतर एक तासानंतर साधारण ५३.२ टक्के बाळाच्या स्तनपानाला सुरुवात केली जाते. सहा ते नऊ महिन्याच्या अर्भकांपैकी ५२.७ टक्के अर्भकांना घन व अल्पघन आहार आणि आईचे दूध मिळते.

**वतुळालेख क्र. १**




स्त्रोत - www.unisef.org (2020)

प्रस्तुत वतुळालेख क्र. १ मध्ये युनिसेफच्या २०२० च्या रिपोर्टनुसार बालके जन्मानंतर विविध व्याधींची लागण झाल्यामुळे कुपोषणाचे बळी ठरतात. जन्मानंतर ३० टक्के बालकांना न्युमोनिया झालेला असतो. तसेच २७ टक्के बालके ही अतिसारने ग्रस्त असतात तर १३ टक्के बालकांना मलेरिया होतो. तर ६ टक्के बालकांना गोवर झालेला असतो. ५ टक्के बालके हे काहीना काही दुखापतीमुळे आजारी पडतात तर ५ टक्के बालके ही एड्स संक्रमित असतात. तसेच १४ टक्के बालके ही इतर कारणांनी आजारी पडतात. त्यामुळे त्याची प्रतिकारशक्ती कमी होते. त्यामुळे ते कुपोषण सारख्या समस्येला बळी पडतात. योग्य वेळी इलाज न झाल्यास कुपोषणाचे स्वरूप तीव्र होऊन मुलं दगावू शकतात.

**संदर्भ सूची :**

१. डॉ. सावंत दिपक रामचंद्र, ''वास्तव कुपोषणाचे'', इंकिंग इनोव्हेशन्स प्रकाशन, वडाळा, मुंबई

२. निखिल मिस्त्री, ''पुन्हा कुपोषणाचा कहर'', लोकसत्ता वृत्तपत्र १३ ऑक्टोबर, २०२०

३. डॉ. सविता मल्होत्रा, कुपोषण', ओम प्रकाशन, नवी दिल्ली (२०१८)

४. सुजाता के. दास, कुपोषण एक ज्वलंत समस्या, वन पब्लिकेशन, (२०१६), नवी दिल्ली.

५. सोनकर सीमा, मलीन बस्तियों में कुपोषण के शिकार बच्चे : एक समाजशास्त्रीय अध्ययन, कुमार प्रकाशन (२०१५), वाराणशी

६. डॉ. रोटेले चंदनसिंह, कुपोषण आदिवासी समुदायाची दुर्बलता, दत्तासन्स प्रकाशन (१ जानेवारी २०२१) नागपूर

७. डॉ. अभय बंग समिती अहवाल (२०१८) प्रकाशन आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली.